②

# कार्यालय, शिक्षण विभाग (प्राथ.), जिल्हा परिषद, सिव्हिल लाईन, नागपूर

-: नमुना - दोन :-


ग्राम : नागपूर शहर
दुरध्वनी : ०७१२-२५६०९०२
ईमेल :- ssanagpur 1 @ yahoo.com.in
फॅक्स :- ०७१२-२५६०९०२


जावक क्र.जिपना प्रा/ RTE/शा.मा./काक्र.२५ब/ 4180 /२०२५
कार्यालय:जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद नागपूर
विभाग: नागपूर, राज्य-महाराष्ट्र
दिनांक :- 31/03/२०२५

प्रति,

अध्यक्ष/ सचिव
फ्रान्सलीन एज्युकेशन सोसायटी,
नागपूर

**विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोटनियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये आपल्या **सन** २०२५-२६ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी या आधारे मी, **सिध्देश्वर काळूसे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर दिनांक ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२८** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता ५ वी ते ८ वी करीता सेंट जॉन पब्लीक स्कूल, मोहन नगर, नागपूर (इंग्रजी — माध्यम सी. बी. एस. ई.)** शाळेस **तात्पुरती मान्यता** देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२) बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्रा एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्कनियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे शाळा पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संस्थेच्या किमान २५ टक्के मर्यादे पर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था/ शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्या ही छाननी पध्दती साठी बालकास किंवा तिच्या माता — पित्यास किंवा पालकाकांना भाग पाडणार नाही.

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म जात किंवा वंश जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (१) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होई पर्यंत शाळेतून काढून टाकण्यास येणार नाही.

(२) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(४) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(५) विकलांग /विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(६) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल परंतु आणखी असे की अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमांन अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(७) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(८) शिक्षकाने / शिक्षिकाने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करील.


St. Johns Public School (CBSE)
Principal
Manager

(3)

८) शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या.

१. शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ८२०० चौ. मि.
२. एकूण बांधकाम क्षेत्रफळ:- ४१०० चौ. मि.
३. खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- २७७५ चौ. मि.
४. शाळेतील एकुण खोल्याची संख्या :- ५४ वर्ग खोल्याची संख्या :- ३०
५ .कार्यालयनि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली:- आहे
६. मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे (मुलासाठी स्वच्छतागृहाची संख्या -०३ व मुत्रीघराची संख्या-१५) वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी (मुलासाठी स्वच्छतागृहाची संख्या -०३ व मुत्रीघराची संख्या-१५) स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल:- आहे.
७. पिण्याची पाण्याची सुविधा:- आहे. (बोरवेल)
८. दुपारचे जेवन शिजविण्यासाठी स्वयंपाक घर:- लागु नाही.
९. अध्यापन – अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता :- आहे. (चार्ट, नकाशे, गणित पेटी, विज्ञान पेटीविज्ञान पेटी इ.) (क्रिकेट, फुटबॉल, लगोरी, बॅबेल्स इ.)
१०. वाचन साहित्य विनासायस उपलब्ध:- आहे. (पुस्तकाची संख्या – ५८००) ग्रंथालय आहे.
११. सर्व सुविधा विना अडथळा उपलब्ध आहेत काय ?:- होय.
१२. शाळेला संरक्षण भिंत आहे काय:- आहे.

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुबई सार्वजनिक विश्र्वस्त्व्यस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४)शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा व्यक्ती संधाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्या करीता किंवा कोणत्याही नफा मिळण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापाला कडून लेखापरिक्षत व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक <u>२७०९१४०४२०६</u> असा आहे. हा या कार्यालयाशी कोणत्याही पत्र व्यवहार करताना कृपया तो नमुद करावा यांची नोंद घ्यावी.

१७)शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासयाठी किंवा शाळेच्या कामकाजातीलत्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेहीनूतनीकरण असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९) बालकांच्या मोफत व सकतीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ प्रमाणे शाळेला आवश्यक असणाऱ्या उपरोक्त त्रुटीची पुर्तता दिनांक ३१.०३.२०२८ पर्यत पूर्ण करण्यात याव्यात अन्यथा आपल्या शाळेची मान्यता त्यापुढे आपोआप संपुष्टात येईल.

(सिध्देश्वर काळूसे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नागपूर

प्रतिलीपी :-

मुख्याध्यापक, सेंट जॉन पब्लीक स्कूल, मोहन नगर, नागपूर यांना माहीतीस अग्रेषित.

St. Johns Public School (CBSE)
Manager
Principal

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नागपूर

NOTARIAL REG
ENTRY No.
DATE 10/8/2026

Office of Education Department (Primary), Zilla Parishad Civil Lines, Nagpur

:- **Sample 2** -:

Village: Nagpur City
No. 0712 – 2560902
Email: ssanagpurl@yahoo.com.in
Fax:- 0712 – 2560902

Outward No. ZPN Pri./RTE/Sha. Phone Ma/KA.Kr. 25B/4180/2025
Office: District Education Officer(Pirm.) Zilla Parishad Nagpur
Division : Nagpur, State Maharashtra

Date: 31/03/2025

To,

President / Secretary

Fransalian Education Society

Nagpur

**Subject :-** Regarding granting of recognition certificate to schools under sub rule (4) of rule 11 of the Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 for the purposes of section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009

In consideration with your application for the year 2025-2026 under the above subject and on the basis of subsequent correspondence with the school/inspection of the school in this regard, I, Siddheshwar Kaluse, Education Officer (Primary) Zilla Parishad, Nagpur, hereby grant provision recognition to St. John Public School, Mohan Nagar, Nagpur (English Medium C.B.S.E.) for classes $5^{th}$ to $8^{th}$ for a period of three years from 01/04/2025 to 31/03/2028.

The above approval is subject to the fulfilment of the following conditions,

1. The period of recognition will not be extended and there will be no obligation under any circumstance to grant or affiliation after Class VIII.

St. Johns Public School (CBSE)

Principal Manager

6

2. The school shall comply with the provision of the Children to Free and Compulsory Education Act, 2009 (Annexure One) and the Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2011 (Annexure Two).
3. The school shall admit children from the weaker section and disadvantaged groups in the vicinity of the school up to a minimum of 25 percent of the student body of that first grade, and shall provide them with free and compulsory education until the completion of primary education, provided that this standard shall also be followed in the case of pre-primary grades.
4. The school shall receive reimbursement in terms of section 12 (2) of the Act for the children referred to in paragraph 3. A separate bank account shall be provided to the school for receiving such reimbursement.
5. The institution /school will not charge any capitation fee and will not force the child or his/her parents or guardians to undergo any screening process.
6. No child shall be denied admission to school on the grounds of religion, caste, race, place of birth or any other grounds whatsoever, for want of proof of age.
7. (1) No child admitted to school shall be kept in the same grade in which he is enrolled or shall be expelled from school until he has completed his primary education

   (2) No child shall be subjected to physical punishment or mental harassment.

   (3) No child shall be required to pass any board examination until he/she has completed primary education.

   (4) Every child who has completed primary education shall be issued a certificate prescribed under rule 23 will be given.

   (5) Students with disabilities/special need will be included as per the provisions of the Act.

   (6) Teachers holding the minimum qualification prescribed under section 23(1) of the Act shall be appointed provided further that teachers holding the minimum qualification on the date of commencement of the Act shall have to acquire such minimum qualification within a period of 5 years.

St. Johns Public School (CBSE)

Principal

Manager

St. Johns Public School (CBSE)

Manager

Principal

(7) The teachers shall perform his/her duties as specified in section 24(1) of the Act.
(8) The school shall ensure that the teacher does not engage in private tutoring.

8. The school will follow the curriculum prepared on the basis of curriculum prescribed by the appropriated authority.

9. The school shall admit students in proportion to the facilities available in the school as prescribed in section 19 of the Act.

10. The school shall comply with the standards and norms specified in section 19 of the Act. The facilities available in the school at the time of the last inspection were as follows:

| | |
|---|---|
| i) Area of the School premises | 8200 Sq. Mtrs. |
| ii) Total construction are | 4100 Sq. Mtrs. |
| iii) Area of playground | 2775 Sq. Mtrs. |

iv) Number of rooms in the school - 54

Number of classrooms 30

v) Office – Storeroom- Principal's Room :- Yes

vi) Separate toilets for boys and girls where there shall be sufficient water for use and to keep the toilets clean and hygienic :- Yes ( Number of Sanitarium for children : 3 and Urinal : 15)

vii) Drinking water facility :- Yes (Borewell)

viii) Kitchen for cooking lunch :- Not applicable.

ix) Teaching and learning materials/Games and Sports related materials/ Library is available: Yes. (Charts, Maps, Maths Box, Science Box etc.). ( Cricket, Football, Lagori, Bumbbells)

x) Reading material is easily available :- Yes (Number of books 5800). There is Library.

xi) Are all facilities accessible without any hindrance? :- Yes.

xii) Does the school have compound wall ?:- Yes

St. Johns Public School (CBSE)
Principal Manager

11. Unapproved classes or sections cannot be run in the school premises or elsewhere.

12. The school building or other construction or playground is only for the purpose of education and skill development, will be used for that purpose only.

13. The school is being run under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) and the Bombay Public Trust Act, 1950.

14. The school shall not be run for the benefit of any group of persons or association of persons or any other person. It shall not be used for profit or for any purpose.

15. The school accounts should be audited and certified by a Chartered Accountant and Account Statement shall be prepared as per rules. A copy of each Account Statement should be submitted to the District Education Officer every year.

16. The Accreditation Code given to your school is 27091404206. Please note that this Code should be mentioned in any correspondence with our office.

17. The school shall submit the reports and information as the Director of Education/District Education Officer may request from time to time or Follow the instructions given by the Government or Local Authority for the purpose of continuously fulfilling the conditions of recognition of the school or to rectify the deficiencies in the functioning of the school.

18. If there is any renewal of the institution 's registration, ensure that it is renewed.

19. As per Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, the above mentioned deficiencies required for the school shall be rectified on or before 31st March 2028. Otherwise the recognition granted to your school shall automatically cease thereafter.

St. Johns Public School (CBSE)

Principal Manager

(Sidhheshwar Kaluse)
Education Officer(Primary)
Zilla Parishad, Nagpur.

Copies to:

Forwarded for information to the Principal, St. John Public School, Mohan Nagar, Nagpur

Sd/
Education Officer(Primary)
Zilla Parishad, Nagpur.

ॲड. मोहम्मद ऐहतेशामोद्दीन
भ्रमणध्वनी ९८५००३१८१७, औरंगाबाद

ATTESTED

Mrs. S.R. MATTA
Advocate & Notary
Clarke Town, Nagpur

NOTARY MRS. S. R. MATTA DIST. NAGPUR (M.S) INDIA REGD. No. 6776 GOVT. OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

St. Johns Public School (CBSE)
Principal Manager